# पनवेल महानगरपालिका
## समाज विकास विभाग
## विरंगुळा केंद्र कार्यपध्दती (SOP)

➢ **उद्देश :-**

ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृद्धापकाळ चांगल्या तऱ्हेने घालवीता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारीरिक,मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे, वृद्धापकाळा मध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता ,कामाचा हक्क ,शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळविण्यासाठी राज्य शासनाने दि.१४/०६/२००४ रोजी राज्याचे जेष्ठ नागरिक धोरण, २००४ (भाग -१) जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या सर्वसमावेशक धोरणास मा. मंत्रिमंडळाने दिनांक ३०/९/२०१३ रोजी मान्यता दिली आहे.त्या धर्तीवर पनवेल महानगरपालिकेने जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार केले आहेत. सामाजीक संवाद, आरोग्य, मनोरंजन आणि समुपदेशनासाठी सुरक्षित व सुसज्ज जागा निर्माण करने हा ही कार्यपद्धती अंमलात आणण्या मागचा उद्देश आहे.

➢ **व्याप्ती :-**

पनवेल हद्दीमध्ये सद्यस्थितीला एकूण २० विरंगुळा केंद्र मालमत्ता विभाग कडून निश्चित करुन समाज विकास विभाग यांना हस्तांतरीत केले आहे.

| अ.क्र. | नोड | सेक्टर | भुखंड क्र. |
|---|---|---|---|
| १ | खारघर | २१ | ४२ |
| २ | खारघर | १९ | १६९A |
| ३ | खारघर | १९ | १३२ |
| ४ | खारघर | १५ | ३६ |
| ५ | कळंबोली | १० ई | १६ ते २१ |
| ६ | कळंबोली | ५ | ३ |
| ७ | खारघर | १५ | २५ |
| ८ | पनवेल (पू) | ८ | १२९ |
| ९ | कळंबोली | २ ई | १० |
| १० | कळंबोली | ६ | ११ |
| ११ | कळंबोली | ६ ई | २ |
| १२ | कळंबोली | १० | १७ |
| १३ | कामोठे | २० | २८+३५+३६ |
| १४ | कामोठे | ५ | ४५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | खांदा कॉलनी | ६ | ९ |
| १६ | नविन पनवेल | ९ | २३ |
| १७ | नविन पनवेल | १४ | ०९ |
| १८ | नविन पनवेल | १३ | १३ |
| १९ | तळोजा | १४ | ९२ |
| २० | तळोजा | ९ | ६ |

- **मुख्यालय स्तरावरील समिती :-**

ज्येष्ठांच्या राष्ट्रीय धोरणात ज्येष्ठ नागरीक समाजाचा एक मौल्यवान घटक आहे. ते आप आपल्या क्षेत्रात कुशल आणि अनुभव संपन्न आहेत. पनवेल महानगरपालिका समाजातील सर्व दुर्बल घटकांसाठी मदत करण्यास कटिबद्ध आहे. याच हेतुने समाज विकास विभाग मार्फत ज्येष्ठ नागरीकांसाठी दिनांक ९ जुलै २०१८ च्या (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) शासन निर्णया नुसार समिती  स्थापन केलेली आहे. या समिती मध्ये खालील पदाधिकारी /अधिका-यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | **मा.अतिरिक्त आयुक्त** | **अध्यक्ष** |
| २. | **परिमंडळ उपायुक्त** | सदस्य |
| ३. | मा. उपायुक्त (समाज विकास विभाग ) | सदस्य |
| ४. | सहायक आयुक्त (समाज विकास विभाग) | सदस्य |
| ५. | ज्येष्ठ नागरीक  एक पुरुष प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | ज्येष्ठ नागरीक एक महिला प्रातिनिधी | सदस्य |
| ७. | समाज विकास आधिकारी (समाज विकास विभाग) | सदस्य सचिव |

वरील समिती शहरातील जेष्ठ नागरिकांच्या हितासाठी निर्णय घेण्याच्या दृष्टीने बांधील राहील तसेच विरंगुळा केंद्र कार्यपद्धती (SOP) च्या व्यतिरिक्त विषयांबाबत वरील समिती निर्णय घेईल व अंतिम निर्णय मा. आयुक्त (पनवेल महानगरपालिका) यांचा असेल.

- **मुख्यालय स्तरावरील समितीची कार्य व कर्तव्य :-**

१. विरंगुळा केंद्र कार्यपद्धती (SOP) मध्ये नमूद नसलेल्या धोरणात्मक विषयाबाबत निर्णय समिती मार्फत घेण्यात येतील.
२. परीमंडळ निहाय समिती कडून विरंगुळा केंद्राची अंमलबजावणी करुन घेणे.
३. शासन निर्णय / परिपत्रक प्राप्त झाल्यास त्यानुसार अंमलबजावणी करणे बाबत निर्णय घेणे.
४. समितीची बैठक त्रैमासिक घेण्यात येईल.

**२. परीमंडळ निहाय समिती :-**

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये २ परीमंडळ असून ५ प्रभाग आहेत. परीमंडळ उपायुक्त (१) यांचेकडे खारघर, कळंबोली, नावडे हे प्रभाग आहेत आणि परीमंडळ उपायुक्त (२) यांचेकडे कामोठे आणि नवीन पनवेल हे विभाग आहेत. प्रभाग निहाय जेष्ठ विरंगुळा केंद्र असून त्या परिमंडळ विरंगुळा बाबत केंद्राबाबत बैठक आयोजीत करण्याची जबाबदारी समिती ची राहील. या समिती मध्ये खालील अधिका-यांचा समावेश आहे.

| | |
|---|---|
| **१. मा. परीमंडळ उपायुक्त** | **अध्यक्ष** |
| २. प्रभाग अधीक्षक | सदस्य |
| ३. प्रभाग आधिकारी | सदस्य |
| ४. जेष्ठ नागरिकांचे संघाचे अध्यक्ष | सदस्य |

➢ **परीमंडळ निहाय समितीची कार्य व कर्तव्य :-**

१. परीमंडळ उपायुक्त यांनी त्यांच्या अधीनस्त असणाऱ्या आधिकारी /कर्मचारी यांचे कडून जेष्ठ विरंगुळा केंद्राचा अहवाल घेणे.
२. प्रभागातील विरंगुळा केंद्रा मध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करणे.
३. जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राला भेट देवून व्यवस्थापन, परिचलन सुरळीतपणे व योग्यरीतीने होत आहे याची पडताळणी करणे.
४. दर दोन महीन्यात बैठक घेवून अहवाल मुख्यालय समितीस सादर करणे.

**३. प्रभाग समिती:-**

१. प्रभाग अधिकारी अध्यक्ष असतील.
२. वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदे प्रमाणे निवड झालेल्या जेष्ठ नागरिक संघाच्या एक महिला, एक पुरुष अध्यक्ष / अध्यक्षा - सचिव असतील.
३. विरंगुळा केंद्रात येणाऱ्या सदस्यामधून दहा जणांची निवड समिती मध्ये सोडचिठ्ठी व्दारे अध्यक्ष / सचिव करतील.
४. दहा जणांची समिती विरंगुळा केंद्रावर देखरेख तसचे नियंत्रणाचे कार्य करतील.
५. समिती सदस्यांची बैठक दर महिन्याला घेण्यात यावी.
६. पाच महीला, पाच पुरुष समितीने दहा जणांची कार्यकारणी तयार करावी. दर महीन्यास एक बैठक घेऊन कार्य विवरण परिमंडळ निहाय समिती सादर करावे.

**४. जेष्ठ नागरिकांचे प्रतिनिधी यांची समिती अध्यक्ष / सचिव यांची निवड प्रक्रिया :-**

१. शासन निर्णयानुसार जी समिति स्थापन केली आहे त्यामध्ये सदस्य म्हणून ज्येष्ठ नागरीक संघटनेतील एक पुरुष प्रतिनिधी व एक महिला प्रतिनिधी यांचा समावेश आहे. त्यांची निवड

प्रक्रिया करणे कामी परिमंडळ निहाय असणाऱ्या विरंगुळा केंद्रातील जेष्ठ नागरिकांचे अर्ज मागवणे. (एक पेक्षा अधिक अर्ज आल्यास) Lottery पध्दतीने निवड प्रक्रिया राबविणे.

२. जेष्ठ नागरिक पुरुष / महिला यांचे वय वर्ष ६० ते ६५ च्या दरम्यान असावे.
३. समितीची बैठक आयोजित केल्या नंतर सलग ३ बैठकी मध्ये गैरहजर असल्यास सभासद पद रद्द करण्यात येईल.
४. कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.
५. समाज कार्याची आवड असावी.
६. प्रभाग अधिकारी जेष्ठ नागरिक प्रतिनिधी विरंगुळा केंद्र प्रतिनिधी, सदस्य, सचिव.

**५. जेष्ठ नागरिक संघाची निवड - EOI करुन मागविण्यात येईल.**

**६. जेष्ठ नागरिक संघाचे कार्य :-**

१. जेष्ठ नागरिकांची दैनंदिन हजेरी तसेच अभिप्राय नोंदणी करणे करिता दैनंदिन राजिस्टर ठेवावे.
२. जेष्ठ नागरिकांना आय. डी. कार्ड उपलब्ध करून देणे.
३. डिजीटल प्रशिक्षण ,स्थानिक (NGO) संस्थेमार्फत मार्गदर्शन सत्र,पेन्शन कायदे ,हक्क जागृती, विविध योजनांची माहिती जेष्ठ नागरिकांना द्यावी .
४. सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत इतर कार्यक्रमाच्या आयोजना ची जबाबदारी जेष्ठ नागरिक संघाची राहील.
५. विरंगुळा केंद्रातील विद्युत दिवे,पंखे,फर्निचर यांचा योग्य व चांगल्या प्रकारे वापर करावा. सदर साहित्याची नासधूस / मोडतोड होणार नाही यांची जबाबदारी घ्यावी. साहित्या ची मोडतोड झाल्यास नुकसान भरपाई जेष्ठ नागरिक संघाची असेल.
६. जेष्ठ नागरिक संघ /असोसिएशन यांनी त्यांचा संपर्क क्रमांक विरंगुळा केंद्र येथे प्रसिद्ध करावा.
७. जेष्ठ नागरिक संघ महानगरपालिकेस प्रती महिना १५० रुपये /- अदा करेल.
८. विरंगुळा केंद्रातील साहित्याची जर काही मोडतोड झाली तर याची सर्वस्वी जबाबदारी जेष्ठ नागरिक संघ/संस्था यांची राहील.
९. विरंगुळा केंद्र व्यावसायिक कार्यक्रमा करीता वापरता येणार नाही.
१०. जेष्ठ नागरिक संघाचा कोणताही मालकी आधिकार विरंगुळा केंद्रावर राहणार नाही.

**७. जेष्ठ नागरिकांची नोंदणी :-**

१. विरंगुळा केंद्रामध्ये सहभागी होणे करीता जेष्ठ नागरिकांनी नोंदणी फॉर्म केंद्रावर भरणे आवश्यक आहे.
२. पनवेल हद्दीतील रहिवाशी असावे तसेच जेष्ठ नागरिकांचे वय ६० वर्ष पेक्षा वरील असावे .
३. ओळख पत्र (आधार कार्ड ,जेष्ठ नागरिक कार्ड ) तसेच २ पास पोर्ट फोटो आवश्यक आहे. (१ आय. डी . कार्ड /१ रेकॉर्ड )

४. विरंगुळा केंद्रात सहभागी होणारे नागरिक मानसिक रुग्ण किवा संसर्गजन्य आजार नसलेले असावेत.
५. नोंदणी करिता कोणतेही शुल्क आकरले जाणार नाही.

८. **जेष्ठ नागरिकांसाठी नियमावली :-**

१. प्रत्येक सदस्याने हजेरी राजिस्टर वर येताना व जाताना स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.
२. स्वच्छता गृह / शौचालये व्यवस्थित राहतील याची जबाबदारी जेष्ठ नागरिकांची राहील.
३. विरंगुळा केंद्रात कोणत्याही प्रकारचे धार्मिक व राजकीय कार्यक्रम घेता येणार नाहीत.
४. विरंगुळा केंद्रात धूम्रपान, मद्यपान आणि जुगार यास बंदी आहे.
५. वाढदिवस व इतर कार्यक्रम करताना केवळ जेष्ठ नागरिक, सदस्य यांच्यासाठीच उपलब्ध राहतील. नातेवाईक व मित्र इतर कामाकरिता उपलब्ध असणार नाही. याची संपुर्ण जबाबदारी जेष्ठ नागरिक संघाची असेल. या बाबत कोणतेही तक्रार येणार नाही याची जबाबदारी जेष्ठ नागरिक संघाची असेल.

पनवेल महानगरपालिकेतील विरंगुळा केंद्र सुरळीत चालविणे करिता विविध विभागांचा समावेश आहे. ते खालीलप्रमाणे.

९. **महानगरपालिका मार्फत देण्यात येणाऱ्या सोई सुविधा :-**

१. **भांडार विभाग :-**

सर्व जेष्ठ विरंगुळा केंद्र यांना भांडार विभाग मार्फत पुढीलप्रमाणे महानगरपालिके कडून सोई सुविधा पुरविण्यात येतील.

१. पुस्तके - वर्तमानपत्र, कादंबरी, वृत्तपत्रे, दैनिक मासिक, दिवाळी अंक इत्यादि .
२. खेळाचे साहित्य - कॅरम बोर्ड , बुध्दीबळ, लुडो इत्यादी.
३. इतर साहित्य - टेबल व खुर्ची इत्यादी .
४. करमणुकीचे साहित्य - टीव्ही इत्यादी.

२. **सुरक्षा विभाग :-**

१. सर्व विरंगुळा केंद्रा करीता सुरक्षा रक्षक हे पनवेल महानगरपालिके मार्फत पुरविण्यात येतील.
२. सदर सुरक्षा रक्षकांची कामाची वेळ त्यांच्या विभाग नुसार असेल.

३. **वैद्यकीय आरोग्य विभाग :-**

१. प्रभाग निहाय असणाऱ्या जेष्ठ नागरिक संघाच्या मागणी नुसार (पनवेल मनपा. च्या प्राथमिक आरोग्य केंद्र च्या समन्वयाने) आरोग्य सुविधा पुरविणे.
२. आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, नेत्रतपासणी, प्रथमोपचार, रक्तदाब व रक्तशर्करा तपासण्याची व्यवस्था करावी.
३. जेष्ठ नागरिकांना आरोग्य प्रशिक्षण,आरोग्य शिबिर इत्यादी गोष्टी वैद्यकिय आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने प्रभाग आधिकारी मार्फत करण्यात यावे.
४. महिन्यात २ वेळेस जेष्ठ नागरिक यांचे साठी मानसिक ताण तणाव कमी करण्या करीता समुपदेशन / मार्गदर्शन करणे.

४. **विद्युत विभाग :-**

१. विरंगुळा केंद्र येथील सर्व केंद्रा मध्ये विज,फॅन ची सुविधा विद्युत विभाग मार्फत केली जाईल.
२. CCTV सुविधा व नियमित तपासणी विद्युत विभाग मार्फत केली जाईल.
३. मासिक वीज बिल जेष्ठ नागरीक संघ अदा करेल.

५. **पाणी - पुरवठा विभाग :-**

१. विरंगुळा केंद्र येथील सर्व केंद्रा मध्ये पाण्याची सुविधा पाणी पुरवठा विभाग मार्फत केली जाईल.
२. मासिक पाणी बिल जेष्ठ नागरीक संघ अदा करेल.

६. **बांधकाम विभाग :-**

१. प्रभाग आधिकारी यांनी बांधकाम विभागाचे स्थापत्य अभियंता यांचे मार्फत जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राची क्षेत्रीय पडताळणी करून विरंगुळा केंद्राची डागडुजी करणे.
२. नवीन केंद्राची उभारणी अथवा दुरुस्ती .

७. **प्रभाग अधिकारी:-**

१. प्रभाग आधिकारी हे नोडल ऑफिसर म्हणून काम पहातील.
२. प्रभाग आधिकारी / संबंधित कर्मचारी आपापल्या प्रभागातील विरंगुळा केंद्रावर नियंत्रण ठेवतील.

८. **जनसंपर्क विभाग :-**

पनवेल हद्दीतील असणाऱ्या सर्व विरंगुळा केंद्रातील कार्यक्रम तसेच जनजागृतीची जबाबदारी पनवेल महानगरपालिका मधील जनसंपर्क (PRO) विभागाची असेल. (प्रभाग कार्यालय, स्थानिक

वर्तमान पत्रे, What's app गट , फेसबुक, NGO व वरिष्ठ संस्था यांच्या मार्फत प्रसिध्दी देण्यात यावी) तसेच जेष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या संबंधित असलेले राष्ट्रीय दिवस साजरे करण्यात यावेत.

**जेष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या संबंधित असलेले राष्ट्रीय दिवस खालीलप्रमाणे.**

- १५ जून : जेष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस(World Elderly Abuse Awareness Day)
- २१ सप्टेंबर: जागतिक (स्मृतिभ्रश) दिवस (World Alzheimer's Day)
- १ ऑक्टोबर : जागतिक जेष्ठ नागरिक दिवस (International Day Of Older Person)

**१०.अभिप्राय व तक्रार निवारण**:-

विरंगुळा केंद्रात अभिप्राय /तक्रार निवारण सूचना पेटी ठेवण्यात येईल. दर महिन्याला अभिप्राय व नागरिकांनी केलेल्या तक्रारी चे निरसन विरंगुळा केंद्र सांभाळणारी संस्था करतील व धोरणात्मक निर्णय व आवश्यक असलेल्या बाबी प्रभाग परिमंडळ समितीमार्फत मुख्यालय समितीकडे पाठवावे.

११. **आर्थिक तरतूद :-** केंद्राचा मूळ खर्च पनवेल मनपा. च्या लेखा सांकेतांक १२०२५५०००२३ ARE १२२६ (विरंगुळा केंद्र दुरुस्ती /नूतनीकरण) यामधून केला जाईल.

**सर्व विरंगुळा केंद्रावर पनवेल महानगरपालिकेचा आधिकार व हक्क असेल तसेच महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास ७ दिवसाची पूर्वसूचना देऊन विरंगुळा केंद्र ताब्यात घेता येईल. वरील नियमावली मध्ये कोणतेही बदल करावयाचे आधिकार मा. आयुक्त (पनवेल महानगरपालिका) यांचे असतील.**

Signed by
Mangesh Pandurang Chitale
Date: 29-10-2025 12:17:43

**(मंगेश चितळे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**